**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED JOURNAL, SEPT-OCT, 2018, VOL- 6/47*

# माध्यमिक शिक्षकांच्या आत्म-प्रचितीचा अभ्यास

**शेखर प्रभाकर पाटील, Ph. D.**

*[एम. ए. व सेट (इति), एम.एड, सेट, नेट व पी एच्. डी. शिक्षणशास्त्र),*

*नेट (वुमेन स्टडीज्), सी-टेट व महा-टेट ], सहा. प्राध्यापक, जे. एस. पी. एस.*

*कॉलेज ऑफ एज्युकेशन, गरताड, धुळे, महाराष्ट्र, ई-मेल- patilspd@gmail.com*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**आत्म-प्रचिती म्हणजे व्यक्ती नैसर्गिकरित्या ज्या कार्यासाठीच जन्मली आहे ते कार्यतीच्या हातून होणे होय. ज्यांनी जगाला नीट जाणलं आहे व जे आपल्या कुवतीचा अधिकाधिक यशस्वी उपयोग करु शकतात, त्या व्यक्तींना आत्म-प्रचिती होते. अब्राहम मॅस्लो या मानसशास्त्रज्ञाने गरजांची जीवर्धित श्रेणी सांगितलेली आहे, त्यातील आत्म-प्रचिती** ( Self-actualization ) **ही अंतिम व सर्व श्रेष्ठ गरज आहे. मॅस्लोने** 1943 **मध्ये** Psychological Review **या नियत कालिकाच्या** 50 **व्या आवृत्तीच्या पृष्ठक्र.** 370 **ते** 396 **मध्ये**'A Theory of Human Motivation' **या आपल्या शोधनिबंधात आत्म-प्रचिती या संकल्पनेबद्दल पुढील विचार मांडलेले आहेत.**' What a man can be, he must be. This need we may call Self-actualization. It refers to the desire for self-fulfillment, namely, to the tendency for him to become actualized in what he is potentially. This tendency might be phrased as the desire to become more and more what one is, to become everything that one is capable of becoming.' **मॅस्लो आपल्या** 'Motivation and Personality'(New York, Harper Pub.) **या पुस्तकात पृष्ठक्र.** 50 **वर म्हणतो,** 'The full use and exploitation of talents, capacities, potentialities etc.' **थोडक्यात, मनुष्य जे होऊ शकतो, ते त्याने व्हायला पाहिजे, शिवाय आत्म-प्रचिती ही आत्म-परिपूर्णतेच्या इच्छा व अपेक्षांचा तसेच एखाद्याला त्याच्या नैसर्गिक गुणांनी जे वास्तविक बनायचे**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**असते त्यांचा संदर्भ देते. नैसर्गिक सामर्थ्य, क्षमता आणि उपजत बुध्दिमत्ता यांचा पूर्णपणे वापर करणे म्हणजे आत्म-प्रचिती होय.शिक्षकाला त्याच्या क्षमता ओळखता येणे, त्यांचा पुरेपूर उपयोग अध्यापन व विद्यार्थी विकास यांच्यासाठी करता येणे या संदर्भाने आत्म-प्रचिती ही प्रवृत्ती अध्यापकासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. शिवाय आपल्यातील सुप्त क्षमतांचा विकास करुन राष्ट्र निर्मितीच्या उदात्त कार्यात शिक्षकाला परिणाम कारकता आणण्यासाठी आत्म-प्रचिती ही शक्ती निश्चितच दिशादर्शक आहे.**

**संशोधनाची गरज :-**

**आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. तंत्रज्ञानामुळे जग एक खेडे झालेले आहे. समाज आणि शिक्षण व्यवस्थायांच्या शिक्षकाकडून अपेक्षा वाढलेल्या आहेत. वर्गात शिक्षकासमोर बसलेल्या विद्यार्थ्याच्या दारापर्यंत माहितीचा साठा अनेक माध्यमांच्या स्वरुपात येऊन पोहोचलेला आहे. त्यामुळे समोरचा विद्यार्थी कदाचित शिक्षकापेक्षा एक पाऊल पुढे असण्याची शक्यता आहे, त्यामुळे शिक्षकाला आजच्या विद्यार्थ्याची जिज्ञासा व ज्ञानाची भूक पूर्ण करण्यासाठी आपल्या सर्वक्षमता आणि उपजत सामर्थ्यपणास लावणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षकाला आपल्या त्या नैसर्गिक क्षमतांची जाणीव होणे व त्यांचा परिणामकारक वापर करता येणे महत्त्वाचे आहे.** 'Study of organization commitment of degree college teachers in relation to the work value self-actualization and leaders behavior.' **या विषयावर मॅथ्यू थॉमस**, (2003, **बंगलोर युनिव्हर्सिटी**) **यांनी संशोधन करुन शिक्षकांच्या अध्यापकीय आणि संघटनात्मक जीवनात आत्म-प्रचितीचे महत्त्व सांगितलेले आहे. म्हणून शिक्षकांच्या आत्म-प्रचितीचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटले.**

**संशोधनाचे महत्त्व :-**

**शिक्षकांच्या क्षमता, त्या क्षमतांची त्यांना असलेली ओळख व त्या क्षमतांचा पुरेपूर वापर या शिक्षण व्यवस्थेसाठी होणे गरजेचे असते. शिक्षकांना जीवनात आत्म-प्रचिती होणे, आपल्या क्षमतांची जाणीव होऊन त्या पुरेपूर वापरता येणे, हे परिणामकारक शिक्षण**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**व्यवस्थेच्या उभारणीसाठी महत्त्वाचे असते. प्रस्तुत संशोधनातून माध्यमिक शिक्षकांच्या आत्म-प्रचितीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. ज्यामुळे माध्यमिक शिक्षकांच्या आत्म-प्रचितीचा स्तर तसेच स्तरानुसार टक्केवारीचाही अभ्यास झालेला असल्याने शिक्षण व्यवस्थेत काही सुधारणात्मक बदल करण्यासाठी सदर अभ्यास मार्गदर्शक ठरणार आहे.**

**संशोधनाचे उद्दिष्ट:-**

**धुळे जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षकांच्या आत्म-प्रचितीचा अभ्यास करणे.**

**संशोधनाचे साधन :-**

**प्रस्तुत संशोधनासाठी आत्म-प्रचितीचे मापन करणारी डॉ. के. एन. शर्मा यांची आत्म-प्रचिती शोधिकाही चाचणी वापरण्यात आलेली आहे.**

**संशोधनाचा नमुना :-**

**प्रस्तुत संशोधनासाठी धुळे जिल्ह्यातील** 5822 **माध्यमिक शिक्षकांच्या जनसंख्येमधून** 900 **माध्यमिक शिक्षकांची निवड केलेली आहे. ज्यामध्ये** 737 **पुरुष शिक्षक** (4857 **पुरुष शिक्षकांमधून**) **व** 163 **स्त्री शिक्षक** (965 **स्त्री शिक्षकांमधून**) **निवडलेले आहेत.**

**संशोधन पध्दती :-**

**सदर संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे.**

**संकलित माहितीचे वर्णनात्मक सांख्यिकीय विश्लेषण व अर्थ निर्वचन :-**

**धुळे जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षकांच्या आत्म-प्रचिती गुणांकांची सांख्यिकी**

| एकूण माध्य मक शक्षक | मध्यमान | मध्यांक | बहुलक | वष मतता | शखरदोष |
|---|---|---|---|---|---|
| **900** | 153.04 | 154 | 148 | – 0.23 | – 0.80 |


Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**निरीक्षण :- सदर कोष्टकावरुन असे निदर्शनास येते की, धुळे जिल्हयातील माध्यमिक शिक्षकांच्या आत्म-प्रचितीचे मध्यमान**153.04, **मध्यांक** 154 **व बहुलक** 148 **आहे. मध्यमान, मध्यांक व बहुलक यांच्या किंमती भिन्न आहेत, म्हणजेच हे वितरण प्रसामान्य नाही. मध्यमानाचे मूल्य हे मध्यांकापेक्षा कमी असल्याने हे वितरण ऋण विषमित आहे. ऋण विषमित वक्रात ऋण बाजुकडे प्राप्तांक विरळ होत जातात व धन बाजुकडे ते एकवटतात. याचाच अर्थधुळे जिल्हयातील बऱ्याच माध्यमिक शिक्षकांना आत्म-प्रचितीमध्ये उच्च क्षमतेचे गुण आहेत. धुळे जिल्हयातील माध्यमिक शिक्षकांच्या आत्म-प्रचिती गुणांच्या आलेखाच्या शिखर दोषाचे मूल्य**- 0.80 **आले असून ते संदर्भ मूल्य** 0.263 **पेक्षा कमी असल्याने हा वक्र उच्च शिखरी आहे.**

**धुळे जिल्हयातील माध्यमिक शिक्षकांच्या आत्म-प्रचितीचे वर्गीकरण**

| आत्म-प्र चती स्तर | एकूण माध्य मक शक्षक (**N= 900)** | शेकडेवारी |
|---|---|---|
| निम्न | 02 | 0.22% |
| सामान्य | 773 | 85.89% |
| उच्च | 125 | 13.89% |
| एकूण | **900** | **100.00%** |

**धुळे जिल्हयातील माध्यमिक शिक्षकांच्या आत्म-प्रचितीच्या गुणांकांचा वर्तुळालेख**




*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**निरीक्षण :-सदर कोष्टक व वर्तुळालेख यांच्या वरुन असे निदर्शनास येते की ,**

**धुळे जिल्हयातील एकूण**900 **माध्यमिक शिक्षकांपैकी आत्म-प्रचितीचा स्तर निम्न असलेले शिक्षक फक्त दोनच** 02 (**शे.**0.22)**आहेत. धुळे जिल्हयातील एकूण**900 **माध्यमिक शिक्षकांपैकी** 773 (**शे.**85.89) **शिक्षकांच्या आत्म-प्रचितीचा स्तर सामान्य आहे. धुळे जिल्हयातील एकूण** 900 **माध्यमिक शिक्षकांपैकी** 125 (**शे.**13.89) **शिक्षकांच्या आत्म-प्रचितीचा स्तर उच्च दर्जाचा आहे.**

**निष्कर्ष :-**

1) **धुळे जिल्हयातील माध्यमिक शिक्षकांच्या आत्म-प्रचिती गुणांचे वितरण हे ऋण विषमित आहे**.

2) **धुळे जिल्हयातील माध्यमिक शिक्षकांच्या आत्म-प्रचिती गुणांचा वक्र हा उच्च शिखरी आहे**.

3) **धुळे जिल्हयातील माध्यमिक शिक्षकांमध्ये आत्म-प्रचिती निम्नस्तरीय असल्याचे प्रमाण हे अत्यल्प म्हणजे** 0.22 % (900 **पैकी** 2 **फक्त**) **एवढेचआढळून आले**.

4) **आत्म-प्रचितीचा स्तर उच्च असलेल्या माध्यमिक शिक्षकांचे प्रमाण हे**13.89% (900 **पैकी** 125) **एवढे आढळून आले**.

5) **आत्म-प्रचितीचा स्तर सामान्य असलेल्या शिक्षकांचे प्रमाण हे** 85.89% (900 **पैकी** 773) **एवढे आढळून आले**.

**संदर्भ :-**

**इंग्रजी संदर्भ ग्रंथ**

***Chavan***, *S.S. (1993). Advanced Education Psychology (V[th] Edition). New Delhi :Vikas* Publishing House Private Limited.

**Goldstein**, Kurt(1995). *The Organism : A Holistic Approach to Biology Derived from Pathological Data in Man*. New York : Zone Books.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**ई-बुक**

**Dennis**, J. Pate (2014). *Self Actualization.*[Kindle Edition].Retrived from *https://www.amazon.in/Self-actualization-Dennis-J-Pate-ebook/dp /B00QPHUNWC*

**इंग्रजी नियतकालिके**

***Maslow**, Abraham H.(1943). A Theory of Human Motivation.Psychological Review, Vol.50, Issue-4, 370-396,*
*doi: https://doi.org/10.1037/h0054346*
***U. Girija**(March, 2014). Self-realization to Self-actualization.International Journal of Multidisciplinary Educational Research, ISSN:2277-7881, Vol.3, Issue 3(5). Retrieved from http://s3-ap-southeast-1.amazonaws.com/ijmer/pdf/volume3-issue3(5)-2014/volume3-issue3(5)-2014.pdf*

**शोधप्रबंध**

***Fernando,** R. Shirley (2015).Self-actualizationand Family Responsibility in the Indian Middle Class Milieu: A Post-colonial Reading of Anita Nair's Select Novels and Short Stories (Doctoral Dissertation). ManonmaniamSundaranar University, Tirunelveli.Retrived from http://www.shodhganga.inflibnet.ac.in/*

**मराठी संदर्भग्रंथ**

***जोशी, बी. आर.** (2007). **शिक्षणशास्त्र विश्वकोश. कोल्हापूर : डायमंड पब्लिकेशन.***

***कऱ्हाडे, बी. एम.** (2007). **शास्त्रीय संशोधन पध्दती. नागपूर : पिंपळापुरे** ॲण्ड **कं. पब्लि.***

***मस्के, टी. ए.** (2007). **शैक्षणिक संख्याशास्त्र. नासिक : इनसाईट पब्लिकेशन्स.***

संकेतस्थळ संदर्भसूची

*http://www.en.wikipedia.org*
*http://www.self-actualizing.org*
*http://www.shodhganga.inflibnet.ac.in*
*http://www.vidyanidhi.org*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*